MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ४९ ते ५३/२००६/**१४९** दिनांक : **१३-१०-२००६**

| | |
|---|---|
| १) श्री. आप्पासाहेब येदू हिप्परकर,<br>मु.पो. सिंगनहळ्ळी, ता.जत, जि. सांगली<br>२) श्री. आनंदा पांडु गडदे,<br>मु.पो. बाज, ता.जत, जि. सांगली<br>३) श्री. सत्याप्पा मायाप्पा खांडेकर,<br>मु.पो. कोंत्याव बोबलाद, ता.जत, जि. सांगली<br>४) श्री. मल्लाप्पा शिवाप्पा येडगोंड,<br>मु.पो. बिळूर, ता.जत, जि. सांगली<br>५) श्री. सुरेश इराप्पा वाठारे,<br>मु.पो. उमळापूर, ता.जत, जि. सांगली<br>तर्फे श्री. एच.डी. खापरे, प्रतिनिधी,<br>रा.जत, जिल्हा-सांगली. | तक्रारदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली.<br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु ग्रामीण विभागीय कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभागीय कार्यालय, जत, जि. कोल्हापूर<br>४) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभागीय कार्यालय, संख, ता.जत, जि. सांगली. | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :- १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) एम.बी. भाजीभाकरे, सदस्य-सचिव

महाराष्ट्र वीज नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

अध्यक्ष, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली मंडल, सांगली यांनी दि. १५/७/२००६रोजी दिलेल्या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांनी विहीत नमुन्यांत प्रस्तुतचे अपील ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर येथे दि. ८–८–२००६ रोजी सादर केले आहे. सर्व तक्रारदारांची तक्रार ही शेती पंपास वीज पुरवठा करण्याबाबतची असल्याने दि. २६–९–२००६ रोजीचे सुनावणीचेवेळी श्री. खापरे तक्रारदार यांचे प्रतिनिधी तसेच वि.प. यांनी या पांचही तक्रार अर्जाची सुनावणी एकत्रिंत करून त्याप्रमाणे निर्णय देण्याची विनंती केली.

(२) सदरचे अर्जावरून तक्रारदारांची प्रमुख तक्रार खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते. तक्रारदारांनी शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी वीज मंडळाकडे सन १९९६ ते २००४ चे दरम्यान अर्ज केले होते. त्यावेळी आवश्यक असलेली डिपॉझिटची रक्कमही अर्जदाराने वितरण परवानेधारकाकडे भरलेली आहे. त्यानुसार वि.प. यांच्या ज्येष्ठता यादींत त्यांचा समावेश करण्यांत आला आहे. तथापि अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दि १५–७–२००६ रोजी आदेश पारीत करून अर्जदाराने महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ मधील कलम ३.३ अन्वये अंदाजपत्रकातील सर्व रक्कम कंपनीकडे भरणा करावी किंवा लाईनचे सर्व काम स्वत: करून कंपनीकडे १५ टक्के देखभाल रक्कम भरल्यास अशा अर्जदारांना महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या कृतीच्या मानकानुसार अर्जदारास वि.प. तातडीने वीज पुरवठा देऊ शकेल असे कळविले आहे.

(३) अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने तक्रारी अर्जाचे कामी सुनावणी न करता कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, सांगली यांचेकडून अहवाल मागवून त्याआधारे तक्रारदारास कळविल्याचे दिसून येते. तसेच वि.प. यांना कळवूनही त्यांनी तक्रारदाराने उपस्थित केलेल्या मुद्यावर आपले अभिप्राय दिलेले नाहीत. सदरची बाब ही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा–हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१३ मधील तरतुदींचे उल्लंघन करणारी आहे याची नोंद वि.प. यांनी घेणे अत्यावश्यक वाटते.

(४) प्रकरणी सुनावणीची तारीख २६–९–२००६ रोजी नेमण्यांत आली होती सदरचे दिवशी तक्रारदारांचे वतीने श्री. खापरे यांनी व वितरण कंपनीचेवतीने वि.प. यांनी लेखी तसेच तोंडी म्हणणे मांडले. सुनावणीचेवेळी उभय पक्षकारांनी सर्व तक्रारीबाबत एकत्रांत युक्तिवाद सादर करून त्याप्रमाणे आदेश देण्याची विनंती मंचास केली. तक्रारदार तसेच वि.प. यांच्या या म्हणण्याची पडताळणी मंचाने करून एकत्रित सुनावणी करण्याचे व त्याप्रमाणे निकाल देण्याचे मान्य केले.

(५) दि. २६–९–२००६ रोजी सुनावणीचे वेळी तक्रारदारांचे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी विहीत “क्ष“ नमुन्यामध्ये नमूद केल्या प्रमाणे ग्राहकांच्या तक्रारी सविस्तरपणे मांडल्या त्यावेळी त्यांनी मंचाचे असे निदर्शनास आणून दिले की तक्रारदार सर्वश्री आप्पासाहेब हिप्परकर, सत्याप्पा खांडेकर व मलाप्पा येडगोंड यांनी अनुक्रमे दि. ५–६–१९९६, २६–३–१९९७ व २५–१–१९९९ रोजी डिपॉझिटची रक्कम भरून चांचणी अहवालही वि.प. यांचेकडे वेळोवेळी सादर केला आहे. तथापि त्यांच्या शेती पंपास वीज पुरवठा अद्याप पर्यंत करण्यांत आलेला नाही. याउलट त्यांना आता वि.प. ने असे कळविले आहे की, त्यांनी कलम ३.३ नुसार वितरण कंपनीकडे अंदाजपत्रकांतील सर्व रक्कम भरणे अत्यावश्यक आहे अथवा त्यांनी ओ.आर.सी. अंतर्गत १५ टक्के देखभाल रक्कम भरून मान्यताप्रप्त ठेकेदारांकडून स्वखर्चाने लाईनची उभारणी केल्यास त्यांना वितरण कंपनी तातडीने वीज पुरवठा करू शकेल. वि.प. यांचा सदरचा आदेश अन्याय कारक असून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कृती माणकांच्या नियमावलीशी विसंगत असल्याने तो रद्द बातल करण्यांत यावा व तक्रारदारांला मागणी केल्याप्रमाणे कृती माणकांमध्ये नमुद असलेल्या तरतूदीनुसार शेती पंपास वीज पुरवठा करण्यांत यावा तसे

झाल्यास तक्रारदार हे विलंबाच्या कारणस्तव त्यांना देय असलेली दंडाची रक्कम / नुकसान भरपाई सोडून देण्यास तयार आहेत.



(६) सुनावणीचेवेळी वि.प. यांनी समक्ष उपस्थित राहून आपली बाजू सविस्तरपणे मांडली. तसेच लेखी निवेदनही सादर केले. त्याचा आषय पहाता वि.प. हे जत/संख उपविभागांस सन २००६–२००७ साली दिलेले उद्दिष्ट साध्य करण्याचेदृष्टीने प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. तसे झाल्यास वि.प. हे या दोन उपविभागांतील १९९९ अखेर प्रलंबित असलेल्या परंतू चाचणी अहवाल न दिलेल्या ग्राहकास सोडून उर्वरित (Paid Pending) ग्राहकांच्या शेती पंपास ३१ मार्च, २००७ अखेर वीज पुरवठा करण्यास सक्षम वाटतात. तथापि वि.प. यांनी दि. १५–७–२००६ रोजी आदेश पारीत करून तक्रारदार यांना महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी ) विनियम २००५ चे कलम ३.३ नुसार वितरण कंपनीकडे अंदाजपत्रकांतील सर्व रक्कम भरणे गरजेचे आहे अथवा या तक्रारदारांनी ओ.आर.सी. अंतर्गत १५ टक्के देखभाल रक्कम भरून मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून स्वखर्चाने लाईनची उभारणी केल्यास त्यांना वितरण कंपनी तातडीने वीज पुरवठा करून शकेल असे कळविले आहे. वि.प. यांनी मा. विद्युत लोकपाल यांचेकडील अपील क्रमांक ४९/२००६ दि. २२–८–२००६ चे आदेशाकडे मंचाचे लक्ष वेधून असे कथन केले आहे की त्यानुसार प्रस्तुत तक्रार अर्जाचे कामी वितरण कंपनीचे बाजुने आदेश व्हावेत. तक्रारदार यांनी अर्जामध्ये मागणी केलेल्या दंडाबाबत वि.प. यांनी असे सांगितले की. तक्रारदारांनी उपरोक्त कलम ३.३ प्रमाणे पूर्तता केली नसल्याने त्यांना दंडाची / नुकसान भरपाईची रक्कम देय नाही.

(७) तक्रारदार यांचे वतीने प्रतिनिधी श्री. खापरे तसेच वि.प. यांनी सुनावणीचे वेळी सादर केलेले तोंडी म्हणणे तसेच लेखी निवेदन व पुरावा विचारांत घेता प्रस्तुत तक्रारीचे कामी खालील प्रमाणे वस्तुस्थिती असल्याचे दिसून येते.

सर्वश्री आप्पासाहेब हिप्परकर व इतर ४ तक्रारदारांनी आपल्या शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी वि.प.कडे सन १९९६ पासून २००४ चे कालावधीत मागणी केली होती. त्यासाठी अर्जदारांनी आवश्यक असलेली डिपॉझिटची रक्कम भरून वि.प. यांचेकडे चाचणी अहवालही सादर केलेला आहे. त्यानुसार उपविभाग पातळीवरील ज्येष्ठता यादीमध्ये त्यांचा समावेश केला आहे. तथापि त्यांना अद्यापपर्यंत वीज पुरवठा करण्यांत आलेला नाही. अर्जदारयांच्या तक्रारींचे निवारण न झाल्यामुळे त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली मंडल कार्यालय, सांगली यांचेकडे धाव घेतली होती. मात्र तेथेही त्यांना आदेश पारीत करून कळविण्यांत आले आहे की त्यांनी कलम ३.३ नुसार वितरण कंपनीकडे अंदाजपत्रकांतील सर्व रक्कम भरावी अथवा ओ.आर.सी. अंतर्गत १५ टक्के देखभाल रक्कम भरून मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून स्वखर्चाने लाईनची उभारणी करावीम्हणजे त्यांना वितरण कंपनी तातडीने वीज पुरवठा करू शकेल. तक्रारदारांपैकी कांही अर्जदारांची शेती पंपास वीज पुरवठा करण्याची मागणी १९९६ पासून प्रलंबित असतांना त्यांना सदरचे आदेशाच्या तारखेपर्यंत कांहीही कळविण्यांत आले नाही. त्यामुळे त्या ग्रांहकास १० वर्षांनंतर कलम ३.३ ची पूर्तता करण्यास सांगणे अयोग्य तसेच अन्याचे होईल असे अध्यक्ष तसेच सदस्य यांचे ठाम मत आहे. या संदर्भात श्री. खापरे यांनी सादर केलेल्या लेखी युक्ती वादांतील एका मुद्याबाबत वि.प. यांनी वस्तुस्थितीची पहाणी करून गंभीरपणे विचार करणे आवश्यक असल्याचे मंचाचे मत आहे. तो मुद्या असा की संख उपविभागांत ब–यांच ग्राहकांच्या लाईन तयार आहेत मात्र त्याची दखल–नोंद वि.प.स नसल्याने ग्राहकास वीज पुरवठा मिळण्यास निष्कारण उशीर होत आहे. सुनावणीचे वेळी वि.प. यांनी जत/संख उपविभागास सन २००६–२००७ साठी दिलेल्या उद्दिष्टांबाबत केलेले कथन पहातां अर्जदारापैकी किमान ३ लोकांना (ज्यांनी मार्च १९९९ पूर्वी अर्ज करून डिपॉझिट भरले आहे) ज्येष्ठता

यादीनुसार मार्च, २००७ पर्यंत विद्युत पुरवठा करण्यास अडचणीचे वाटत नाही. तसेच श्री. सुरेश वाठारे यांचे प्रकरणी जवाहर योजनेंत असलेले पोल उभे केले असल्याने सदरचे योजनेअंतर्गत त्यांचे शेती पंपास वीज पुरवठा करण्यास वि.प. यांना कसलीही



अडचण नसावी अशी मंचाची धारणा आहे. उर्वरित एका तक्रारदारास वि.प. यांनी शेती पंपास वीज पुरवठा करण्याकामी मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोग, मुंबई यांनी दि. १–६–२००६ रोजी दिलेल्या निकाला विरूध्द अपीलेट ट्र ायब्युनल, दिल्ली यांचेकडे दाखल केलेल्या अपीलाचे कामी होणा–या आदेशानुसार वीज पुरवठा करण्यांत यावा असे मंचाचे मत आहे.

**<u>ग्राहक गा–हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर या मंचाचा सदस्य–सचिव म्हणून मी माझे मत खालील प्रमाणे नोंदवित आहे व त्याचा सर्वार्थाने विचार होणे गरजेचे आहे:–</u>**

१९९९ अखेर प्रतिक्षा यादीवर असलेल्या सर्व अर्जदारांना मार्च, २००७ पर्यंत विद्युत पुरवठा करणे सहज शक्य आहे असे मंचाचे अध्यक्ष व सदस्य यांना वाटत असले तरी या मंचाचा सदस्य–सचिव हे या मतास सहमत नाहीत कारण सदर कामाकरिता ग्रामीण विद्युतिकरण महामंडळाकडून निधी मंजूर करून घ्यावा लागतो व सदर निधी व ती ही कर्जाऊ रक्कम शासनाची हमी मिळाल्यानंतर हप्त्या–हप्त्याने वितरण कंपनीस प्राप्त होते, त्यामुळे शेती पंपाचे उर्जिकरण शासनाच्या निधी उपलब्धतेवर अवलंबून आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ च्या कलम ४.४ नुसार विद्युत परवानेधारक जेथवर शक्य असेल तेथवर वीज दराच्या वर्गवारीतील प्रथम येणा–यास प्रथम प्राधान्य या तत्वावर वीज पुरवठा करील.

एखाद्या ग्राहकास तातडीने क नेक्शन हवे असल्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ च्या कलम ३.३ मधील उपकलम ३.३.२ व ३.३.४ अन्वये विद्युत वाहिनी उभारणीसाठी येणारा सर्व खर्च भरण्यास तयार असेल अथवा परवानेधारक विद्युत ठेकेदाराकडून वाहिनी उभारणीचे काम करून घेऊन विद्युत परवानेधारकाकडे १५ टक्के देखभाल रक्कम भरण्यास तयार असेल तर त्यांना तातडीने विद्युत पुरवठा करू शकेल.

सदर तक्रारदारांनाच ३१ मार्च, २००७ पर्यंत कनेक्शन द्यावयाचे म्हटल्यास महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, विनियम २००५ चे कलम ४.४ प्रमाणे प्रथम येणा–यास प्रथम प्राधान्य या तत्वावर आधारित प्रतिक्षा यादीतील इतर अर्जदारांना डावलून वरील तक्रारदारांना विद्युत पुरवठा करावा लागेल त्यामुळे प्रतिक्षा यादीतील इतर अर्जदारावर अन्याय केल्यासारखे होईल तेंव्हा विद्युत लोकपाल यांचेकडील अपील नं. ४९/२००६ दि. २२/८/२००६ च्या आदेशाप्रमाणे कार्यवाही व्हावी अथवा मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग, मुंबई यांनी दि. १ जून, २००६ रोजी दिलेल्या निकाला विरूध्द ट्रायब्युनल कोर्ट, दिल्ली यांचेकडे दाखल केलेल्या अपिलाचे कामी होणा–या आदेशानुसार वीज पुरवठा करावा असे सदस्य–सचिव यांचे मत आहे.

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली मंडल, सांगली यांनी सदर प्रकरणी दिनांक २१/०८/२००६ रोजी दिलेला आदेश योग्य आहे असे या मंचाचे सदस्य–सचिव यांचे मत आहे.

तक्रारदार व वि.प. यांनी सुनावणीचे वेळी सादर केलेले तोंडी / लेखी निवेदन, पुराव्याचे कागदपत्र, प्रकरणांतील वस्तुस्थिती, तसेच याकामी मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने केलेल्या विनियमांतील तरतुदींचा विचार करून मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे –



# आदेश

१. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष सांगली यांचेकडील दि. १५/७/२००६ चे आदेशामध्ये अंशत: फेरबदल करण्यांत आला आहे.

२. अर्जदारापैकी सन १९९६ ते १९९९ पर्यंत प्रतिक्षा यादीवर प्रलंबित असलेल्या अर्जदारांकडून अत्यावश्यक कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन तसेच त्यांचेकडून प्रचलित दरपत्रकानुसार देय असलेली फरकाची रक्कम भरून घेऊन वि.प. यांनी अर्जदारांच्या शेती पंपास ३१ मार्च, २००७ पर्यंत वीज पुरवठा करावा.

३. उर्वरित दोन तक्रारदारांना वर नमुद केल्याप्रमाणे वीज पुरवठा करण्यांत यावा.

४. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी विहित मुदतींत करून तसे केल्याचे विनियम २००६ चे कलम ८.३ चे तरतुदीनुसार मंचास ३० एप्रिल, २००७ पर्यंत कळवावे.

५. या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल “केशवा” बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०००५१ यांचेकडे करता येईल. तसेच वि.प. यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना मा.ना. उच्च न्यायालय, मुंबई, अथवा दिवाणी न्यायालयात करता येईल.

| | | |
|---|---|---|
| (एम.बी.भाजीभाकरे) | (जी. सी. लेले) | (के. व्ही. पाटील) |
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |